जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

(भूसंपादन समन्वय विभाग)

क्र.2016/भूसं/समन्वय/कावि-474
दि. 2.05.2016

# जाहीरात

**(कलम ४ (नियम ३)**

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ४ अंतर्गत व नियम २०१४ च्या नियम ३ नुसार लातूर जिल्हयातील विविध प्रकल्पासाठी जमिनीचे भूसंपादन करण्यापूर्वी प्रकल्पबाधित क्षेत्रातील बाधित होणा-या कुटुंबाचे सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन कार्यविभाग / समाजशास्त्र शाखा / अर्थशास्त्र – शाखा यापैकी कोणत्याही प्रशिक्षण विद्याशाखा किंवा यासारख्या शासकीय संस्था किंवा अशासकीय संघटना व व्यावसायीक संस्था (किंवा अशासकीय संघटना व व्यावसायिक संस्था) यांच्याकडून सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अहवाल व सामाजिक व्यवस्थापन योजना तयार करण्यात येणार आहे. यासाठी खालील पात्रता पूर्ण करणा-या विद्यापीठ / शासकीय महाविद्यालय/ सामाजिक कार्यविभाग / समाजशास्त्र शाखा / अर्थशास्त्र शाखा व अशासकीय संघटना/ व्यावसायीक संस्था व जाहिरातीव्दारे अर्ज मागविण्यात येत आहे.

खालील पात्रता पूर्ण करणा-यांनी दिनांक 18.05.2016 रोजी 5.30 पर्यंत वा. जिल्हाधिकारी लातूर (भूसंपादन-समन्वय विभाग) यांच्या कार्यालयात अर्ज दाखल करावेत.

__पात्रता:-__

१. संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय / विद्याशाखा हे शासन मान्यताप्राप्त असावी.
२. संबंधित अशासकीय संघटना / व्यावसायिक संस्था / शासकीय संस्था ही नोंदणीकृत असावी.
३. शासकीय मान्यता किंवा नोंदणी ही या जाहिराती पूर्वी ३ वर्षे पूर्ण झालेली असावी.
४. सामाजिक परिणाम अभ्यास करण्यासाठी व सामाजिक परिणाम व्यवस्थापन योजना यांच्या कामाचा कमीतकमी ३ वर्षांचा अनुभव असावा.
५. संबंधित संस्थेचे शासनमान्य लेखा परिक्षणाकडून ३ वर्षाचे लेखा परिक्षण केलेले असावे.
६. या कामासाठी योग्य ते प्रशिक्षीत मनुष्यबळ, प्रशिक्षणासाठी इमारत, फर्निचर, कार्यालय, वाहन व्यवस्था इत्यादी संस्थेच्या मालकीचे असावे व ते अद्यावत असावे.
७. अर्जाचा नमुना हा www.latur.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
जिल्हाधिकारी लातूर

प्रतिलीपी :- जिल्हा माहिती अधिकारी लातूर यांना देवून सुचित करण्यात येते की, सदरचे जाहीर प्रगटन जास्तीत जास्त स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातमी वजा प्रसिध्द करण्यात यावे.

सही/-
जिल्हाधिकारी लातूर, करीता.

2 प्रेस नोट दुरध्वनी. (02382) 243234, 255204, 255205 विस्तारीत-355 फॅक्स (02382) 242330
जिल्हा संकेतस्थळ www.latur.nic.in E-mail ID- collector.latur@maharashtra.gov.in, awla.latur@maharashtra.gov.in

जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
(भूसंपादन समन्वय विभाग)

## सामाजिक परीणाम निर्धारण करणेसाठी (SIA)
## करावयाच्या अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदार संस्थेचे नांव व पुर्ण पत्ता | |
| २ | मेल आय डी संपर्क | |
| ३ | संस्था / संघटना यांचे नोंदणी प्रमाणापत्र | |
| ४ | सामाजिक परीणाम निर्धारण कामाचा अनुभव (सविस्तर ईतिवृत्त) | |
| ५ | संस्थेचे शासन मान्य लेखा परिक्षणाकडुन केलेले गत ३ वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल | |
| ६ | संस्थेकडे सदरच्या कामासाठी योग्य य प्रशिक्षीत मनुष्यबळ इमारत, फर्निचर, कार्यालय, वाहन इत्यादी बाबत माहीती. | |
| ७ | संस्थेची घटना | |
| ८ | संस्थेने यापुर्वी केलेले उल्लेखनिय कामाचा तपशिल | |

सही
अध्यक्ष / चेअरमन

3 प्रेस नोट दुरध्वनी. (02382) 243234, 255204, 255205 विस्तारीत-353 फॅक्स (02382) 242330
जिल्हा संकेतस्थळ www.latur.nic.in E-mail ID- collector.latur@maharashtra.gov.in,
awla.latur@maharashtra.gov.in